# मराठी साहित्यावरील गांधीवादाचा प्रभाव

**प्रा. डॉ. बाळासो आण्णा सुतार**, प्रा.डॉ. एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर.

साहित्य आणि समाज यांचा फार जवळचा असा संबंध आहे. समाजातील प्रत्येक घडामोडीची नोंद साहित्यात होत असते. भारतीय राजकारणात महात्मा गांधी यांचे स्थान खूप अग्रगण्य, महत्वाचे आहे. क्रियाशील तत्त्वचिंतकांच्या मालिकेत त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. सत्याग्रह दर्शनाचे प्रणेते, स्वातंत्र्यलढ्याचे सेनानी, विधायक दृष्टीचे सुधारक आणि धर्म व नीती यांच्या ऐक्यभावाचा पाठपुरावा करणारे आधुनिक संत म्हणून त्यांची ख्याती आहे. इतिहासावर आपला प्रभाव पाडणारे म्हणून भारतीय इतिहासात महात्मा गांधी यांचा विचार केला जातो. भारतीय परिवर्तनाचा इतिहास हा क्रांती आणि प्रतिक्रांतीचा इतिहास म्हणून ओळखला जातो. या परिवर्तनाच्या कचाटयात आपल्याला काही विचारसरणीचा अवलंब करावा लागतो. त्या विचारसरणी जीवन जगण्यासाठी आदर्शवत अशा असतात त्यापैकीच एक म्हणजे गांधी विचारसरणी किंवा गांधीवाद होय .

मोहनचंद करमचंद गांधी हे गांधीजींचे पूर्ण नाव. २ ऑक्टोंबर १९६९ यादिवशी गुजरातमधील पोरबंदर या गावी त्यांचा जन्म झाला. धार्मिक कुटुंबाचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्याची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी होती. त्यांचे वडील तीन पिढ्यांपासून संस्थानाची दिवानगिरी (राजकोट) करीत होते. ते अतिशय लोकप्रिय होते. त्यांचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. गांधीजीची आईसुद्धा खूप धार्मिक असून त्यांच्या जीवनावर तिचा फार मोठा परिणाम झाला आहे. गांधी यांचा विवाह वयाच्या १३ व्या वर्षी झाला होता. लहानपणापासून त्यांच्या मनात सर्वधर्मसमभावाची भावना होती. सन १८८७ मध्ये ते मॅट्रिक झालं. नंतर बॅरिस्टरचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जात असताना त्यांनी आपल्या आईला असे वचन दिले की, परस्वीशी संबंध ठेवणार नाही, मांस अथवा दारुला शिवणार नाही. या वचनाचे पालन गांधीजीनी शेवटपर्यंत केले. इ.स. १८९१ बॅरिस्टर ही पदवी घेऊन भारतात आले आणि मुंबईला वकिली व्यवसाय सुरुवात केली. १८९३ मध्ये एका मुसलमान व्यापाऱ्याचा खटला चालविण्याकरिता त्यांना दक्षिण आफ्रिकेला जावे लागले, तेथील भारतीयांची होनदोन अवस्था व इंग्रजांचे जुलूम पाहून त्यांचे मन कळवळले, त्यांनी आत्मशुद्धी व आत्मसंयम यांचा अभ्यास केला आणि सत्याग्रहाची पद्धती विकसीत केली. १९२० च्या आसपास कमालीच्या घडामोडी घडत असताना गांधीचा उदय झाला. धर्म-साहित्य आणि संस्कृतौ तर सोडाच पण सर्वच क्षेत्राच्या मुळाशी फार मोठे फेरबदल झाले. इ.स. १९२० ते १९४७ या कालखंडात भारतीय राजकीय, आर्थिक घडामोडीवर त्यांचा प्रभाव होता. म्हणून नामदार गोखले म्हणतात, "जी माणसे गांधीजींच्या प्रत्यक्ष सहवासात येतात त्यांनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी कळून येते. गांधीजीची घडण ही हुतात्मा घडतात अशा द्रव्यातून झालेलो आहे. इतकेच नव्हे तर आपल्या सहवासातील सामान्य माणसांनाही वीर हुतात्मे बनविण्याची आत्मिक शक्ती त्यांच्यामध्ये आहे. संपूर्ण भारत गांधीकडे एक 'सांस्कृतिक वीर' Cultural Hero म्हणून पाहताना आपल्याला दिसतात. एकाचा अंत अन् दुसऱ्याची सुरुवात या प्रमाणे टिळकांचा प्रभाव त्यांचा निधनानंतर कमी झाला. प्रखर राष्ट्रवादाला तडा जावून लोकशाही मार्गाने या साबरमतीच्या संताने मोठा देशव्यापी लढा निर्माण केला. त्यांचा प्रभाव मराठी साहित्यावर अगदी खोलवर पडलेला दिसतो आहे..

समाजाच्या उत्थानासाठी जो विचार गांधीनी मांडला त्याला गांधीवाद म्हणता येईल. जे काही साधे, सरळ समन्वयवादी आहे त्याला गांधीवादी म्हणता येईल, गांधीवादाचा उद्देशच मुळात सर्वसामान्य गरीब माणसांचे हित जोपासणे होय. गांधीवादी मनुष्य असा शब्द उच्चारला की आपल्या डोळयासमोर विशिष्ट विचारसरणीपेक्षा विशिष्ट आचारसरणीचा मनुष्य येतो. गांधीवादी माणूस म्हणजे न चिडणारा, न संतापणारा, शांत क्षमाशील वृत्तीचा माणूस, त्यांच्या अंगावर साधे खादीचे कपडे असणारा, पादत्राणेही अगदी स्वस्तातली व साधी असणार, गरजा किमान असणे, मात्र काही गोष्टी त्याला चालणार नाहीत म्हणजे नाही. वागणुकीचे नियम तो इतक्या कसोशीने पाळेल की जसे धर्मनियम आहेत. गांधीवाद वाचणे, अभ्यासणे सोपे आहे. याचे आचरण करणे फार अवघड. कोणत्याही साहित्यावर विचारसरणीचा प्रभाव म्हणजे तो मूलगामी अशा स्वरूपाचा असतो. कोणतीही विचारसरणी ही मानवी जीवनाला आदर्श असे वर्तन शिकविणारी अशीच असते. या विचारसरणीचा प्रभाव पुढे काही पक्षावरही पडलेला

दिसतो. मग या विचारांपासून साहित्य कसे सुटेल. गरीब माणसाची सेवा म्हणजेच ईश्वरसेवा होय. ही वृत्तीच त्यांना या गरीब जनतेचा खरा नायक बनवू पाहत होती. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हेच गांधीवादाचे मुख्य सूत्र आहे. गांधी संदर्भात डॉ. केशव तुपे म्हणतात, "जीवनात सतत सत्यचा, मांगल्याचा पाठपुरावा करणारा हा महात्मा कलेकडूनही नैतिक मूल्यांची अपेक्षा करतो. निसर्ग निर्मित सौंदर्याने मोहून जाणारा हा मोहनदास जीवनापेक्षा कलाश्रेष्ठ मानायला तयार नाही, विशुद्ध जीवन जगणारा मनुष्यच सर्वश्रेष्ठ कलावंत असल्याचे त्याचे म्हणणे आहे. (Purity of life is the highest kind of Art)" म्हणूनच गांधीजींना जनसामांन्याच्या व्यथाचे, वेदनेचे चित्रण करणारे साहित्य महान वाटते. या गांधीवादाचा फार मोठा प्रभाव मराठी साहित्यावर पडलेला दिसतो.

१९२० नंतर भारतीय स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींचा उदय झाला. भारतीय राजकारणासह चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे गेले. म. गांधीजींच्या पूर्वी स्वातंत्र्याची चळवळ शहरापुरती मर्यादित होती. ती गांधीजीमुळे ग्रामीण भागापर्यंत, सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचली आणि देशव्यापी बनली. 'खरा भारत खेड्यात आहे. खंड्याचा विकास हाच देशाचा विकास आहे. म्हणून पहिल्यांदा खेडी सुधारली पाहिजेत' या जाणिवेतून महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' ची हाक दिली. यामुळे राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंतांचे लक्ष खेड्याकडे वेधले गेले. या घटनेचा परिणाम साहित्यविषयक भूमिकेवरही झाला आहे. गांधीवादावर तथा गांधीजीच्या कर्तृत्वावर काही ग्रंथ, प्रबंध, निबंध लिहिले गेले तसेच या कालखंडात कथा, कादवरी व नाटके या सर्व क्षेत्रात गांधीवादाचे पडसाद प्रभावीपणे उमटले. मराठी साहित्याची धुराही प्रस्थापित लोकांच्या हातात असल्यामुळे गांधीवादाचा उपयोग केवळ समकालीन प्रश्न हाताळण्यासाठीच झाला असे म्हणता येईल. समकालीन बाबाराव सावरकरांनी या सगळया विचारांना गांधीगोंधळ संबोधून आपण टिळकनिष्ठ असल्याचे दर्शविले आहे. गांधीवादाचा समकालीन मराठी साहित्यावर इतका प्रभाव होता की, संपूर्ण कला प्रकारात गांधीला हाताळणारे सगळेच प्रयोग त्या काळात करण्यात आले. गांधीवादाचा शोध घेण्यासाठी त्या काळात वेगवेगळी चर्चासत्रे घेतली जात होती. विशेष म्हणजे त्याच विचारसरणीने नियतकालिकेही निघायला सुरूवात झाली. उदा. साधना, नवभारत, समाज प्रबोधन पत्रिका इ. नियतकालिकातून त्यांच्यावर भरभरून लेख येवू लागलेले दिसतात. केतकरांच्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीत विश्वकुटुंब वादाबरोबरच समाजवादाचाही पुरस्कार केला आहे. त्याबरोबर हे दोन्ही वाद व्यक्तीविकासाला घातक होण्याचा संभव आहे अशी भीतीही व्यक्त केली आहे. 'इंदुकाळे सरला भोळे' या त्यांच्या कादंबरीत त्यांनी गांधीवादाचा बुद्धीप्रामाण्यवादी परामर्श घेतला आहे. यातील नायक विनायक हा गांधी यांच्या प्रभावाखाली असून ते गांधी यांच्या चळवळीत भाग घेतात व जेलमध्ये जातात. तरीही ते पूर्ण गांधीवादी नाहीत. गांधीवादी लोक कसे दुराग्रही असतात हेही त्यांनी दाखवून दिले आहे. वि.स. खांडेकर यांच्या साहित्यावरही गांधीवादाचा प्रभाव आहे 'कांचनमृग' पासून ते 'ययाती' पर्यंत गांधीवादाचा प्रभाव जाणवतो. 'दोनध्रुव' या कादंबरीतही गांधीवादी विचारसरणी उमटली आहे. तरीही असे म्हणता येत नाही की खांडेकरांची प्रकृती गांधीवादी असली तरी गांधी यांचा अतिरेकपणा खांडेकरांना पसंद नव्हता असे दिसते. या कालखंडात फडके-खांडेकर वाद हा सर्वश्रुत आहेच. या वादात एकांनी टिळकांची भूमिका घेतलेली दिसते आहे आणि दुसयांनी गांधींची विचारसरणी स्विकारलेली दिसते. प्रेमा कंटक व साने गुरुजी हे पण गांधीवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांची गांधीवादावर अतिशय श्रद्धा व निष्ठा आहे पण त्यांच्या साहित्यात शुद्ध गांधीवाद नाही. प्रेमा कंटक यांनी काम आणि कामानी व अग्नीयान या कादंबरयात गांधीवादी चौकट दर्शविली आहे. मामा वरेरकरांच्या अनेक कादंबऱ्यातून गांधीवाद दिसतो. त्याची 'धावता धोटा' मधून मार्क्सवाद तर 'फाटकी वाकळ' मधून गांधीवाद अविष्कृत होताना दिसतो. माडखोलकरांच्या प्रेमाचा त्रिकोन निर्माण करून नायकाचा अप्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामात सहभाग दाखवता दाखवता गांधीची चळवळ ते दृष्य दाखवितात. फडक्यांची 'आशा' मध्ये गांधीवादाचा प्रभाव दिसतो आहे. धरणाच्या माध्यमातून जो संघर्ष निर्माण झाला त्याला चळवळीचे स्वरूप फडके देताना दिसतात. मर्ढेकरांची पाणी' कादंबरी एका बाजुला आधुनिक सुधारणांना चालना देते तर दुसरीकडे धरणामुळे विस्थापित झालेल्यांच्या प्रश्नाचा विचार करताना दिसते. साने गुरुजींनी कांता, संध्या, रामाचा शेला, धडपडणारी मुले, श्याम व श्यामची आई या कादंब-या लिहून आपली निष्ठा प्रकट केली आहे. त्याचे सर्व नायक गांधीवादी आहेत. साने गुरुजी अस्सल गांधीवादी साहित्यिक होत. गांधीच्या व्यक्तिमत्वाचा फार खोलवरचा

परिणाम साने गुरूजीवर झालेला दिसतो. त्यांची 'भारतीय संस्कृती' किवा त्यांचे निवडक निबंध असोत किंवा मूल्यात्मतेची शिकवण देणारी 'श्यामची आई' असा या सर्व साहित्यातून त्यांनी संपूर्ण गांधी अवतरला आहे. उपेक्षितांचे अंतरंग' रेखाटणाऱ्या माटे यांच्या कथांतून गांधीवाद डोकावतो. गांधी यांनी राजकीय आंदोलनात लढा उभारला व आपली राजकीय, सामाजिक व अर्थकारण विषयक मते 'यंग इंडिया व 'हरिजन' या साप्ताहिकातून मांडून तत्कालीन विचारवंतांना फार मोठा धक्का दिला व राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रांत फार मोठी खळबळ उडवून दिली. गांधी यांच्या विचाराचा सर्व क्षेत्रावर प्रभाव उमटला. त्याला बयाच अशा गांधी यांचे साधुशील व्यक्तिमत्त्व कारणीभूत होते. गांधी आणि त्यांच्या विचारांवर अनेक राजकीय विचारवंतांनी महत्त्वाचे लेखन केले. आचार्य जावडेकर यांची गांधी जीवनावरील पुस्तके मुख्यत्वे विवेचन प्रबंधाच्या कक्षेत येणारी आहेत. आचार्य जावडेकरांनी 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या पुस्तकातील लेखातून गांधी व टिळक यांच्या जीवनदृष्टीचा मुलगामी स्वरुपाचे तुलनात्मक विवेचन केलं आहे. श्री. दादा धर्माधिकारी यांनी प्रबंधात्मक लिखाण केले. याशिवाय प्रभाकर दिवाण यांनी आपल्या पुस्तकात गांधी यांच्या काही आठवणी लिहिल्या आहेत. गांधीजीचे खरेखुरे विचार व्यक्त करणारे शिष्य म्हणजे विनोबा भावे यांनी गांधी तत्त्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत सांगितले आहे. बाबा आमटे विनोबा यांनी गांधीना आपल्या साहित्यकृतीत उतरविले आहे. समकालीन साहित्यात कलेसाठी कला सोडून जगण्यासाठी कला असा एक वेगळा बाज मराठी साहित्याला गांधीवादामुळेच प्राप्त झाला.

मराठी कादंबरीप्रमाणे काव्यावरही गांधीवादाचा परिणाम आहे. आधुनिक मराठी कवितेच्या केशवसुतोत्तर वाङ्मयीन कार्य १९२० च्या आसपास संपुष्टात आले. १९३० ते १९४० या काळातगांधी यांची थोरवी व स्वातंत्र्य आंदोलनाची महती गाणारे शेकडो कवी निर्माण झाले. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळताच त्यांच्या काव्यकृतीही नष्ट झाल्या. भा.रा. तांबे सौंदर्यवादी व प्रणयप्रधान गीत गाणारे भावकवी आहेत. पण त्यांच्या काव्यात गांधीवादाचा प्रभाव दाखविणाऱ्या एकूण पाच कविता आहेत. 'रुद्रास आवाहन ही प्रसिद्ध कविता त्यांनी ब्रिटिश सरकारने जालियनवाला बागेत निःशस्त्र प्रजेवर क्रूर गोळीबार करून जे असंख्य लोक ठार मारले त्याला उद्देशून आहे. गाड़ी बदली, अब तुम जयजयकार, प्रतिज्ञा, वाटले नाथ हो इत्यादी त्यांच्या कविताही गांधीवादाचाच उल्लेख करतात.

भा. रा. तांबे यांच्यानंतर रविकिरण मंडळाच्या बाहेरील अनेक कवींनी गांधीवर कविता लिहिल्या आहेत. फडणीसांनी 'असहकारितेचा दसरा' ही कविता लिहिली. कुंजबिहारी यांनी आपल्या 'गीत गुंजारवात' मुळशी पेठेच्या सत्याग्रहावर मुळशी पेठेचा पाळणा इ. कविता लिहिल्या आहेत. त्यांची 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कविता त्या काळात फार लोकप्रिय ठरली. माधव ज्युलियन यांच्या मनात त्यांच्याबाबत आदर होता. गांधी यांच्या ठिकाणी साधुत्व आहे अशी त्यांची श्रद्धा होती. याशिवाय कवी यशवंत, गिरीश, विठ्ठल घाटे, बा.भ. बोरकर, राजा मंगळवेढेकर, सोपान चौधरी, ग.ह. पाटील, कुसुमाग्रज, वसंत बापट, मंगेश पाडगावकर यांच्या कवितेतून गांधीजीविषयी आदर व्यक्त करण्यात आला आहे. तर गांधीजीच्या मृत्यूनंतर ग. दि. माडगूळकर, विंदा करंदीकर, कृ.ब. निकुब, बा.रा. कांत, वा.सी. मर्ढेकर यांच्या दुःखद मृत्यूवर श्रद्धांजलीरूपी कविता उभी केली आहे. विंदानी आपल्या 'धोंडया न्हावी' या कवितेत गांधीचे तत्वज्ञान सांगताना म्हणतात, "थोडया न्हावी म्हणजे विचित्र प्राणी/ गांधीवधाच्या नंतर लगेच दुसऱ्या दिवशी/ दाढी करता करता हलक्या आवाजात मला तो गंभीरपणे म्हणतो./ गांधी म्येलो म्हणतात. लघु लघु मनात होता./ या बाजूक येता तर फुकट करूनची त्येची एक हजामत / बाहमण होते भवती परंतु त्यानी नव्हती हसण्या रडण्याची उरलेली हिंमत / हसणे रडणे एकच अतीलही गंमत (करंदीकर, धोंडया न्हावी संहिता ६५) तर मर्ढेकर म्हणतात – "अशीच जावी काही वर्षे / आणि महात्मा यावा पुढचा / आम्हांस आम्ही पुन्हा पहावे / काढून चष्मा डोळ्यांवरचा" पुढचा महात्मा केव्हा येईल हे कोणालाच सांगता येणार नाही. थोडक्यात कायतर सर्वसामान्य माणसाच मनात बसलेले गांधीजींचे चित्र काव्यरुपाने गांधीवादाचा प्रभाव दर्शवत आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात प्रचंड अशा स्वरूपाची उलथापालथ झाली. हा सगळा खटाटोप सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठीच झाला. स्वातंत्र्य आणि भारतीय राज्यघटना या दोन घटनेमुळे जगण्याची दिशाच बदलली. बहुजनांचा वाकलेला कणा उभारण्यासाठी मदत झाली आणि मूलभूत हक्काचा विचार होण्यास सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवमुक्तीचे प्रयत्न सर्वमान्यच आहेत. त्यात पुन्हा गांधीवादाला

ओढले गेले. गांधी आणि आंबेडकर यांची विचारसरणी परस्पर विरोधी अशा स्वरूपाची होती. पण दोघांचा उद्देश एकच सर्वसामान्याचा बहुजनांचा विकास झाला पाहिजे. भले तो शहरात असेल किंवा खेडयात असेल समाजाच्या कल्याणसाठीच हे विचार चाद निर्माण झाले आहेत. दलित साहित्याची सुरुवातच मुळात दलित आत्मकथनांनी झाली. गांधीच्या 'माझे सत्याचे प्रयोग' चा प्रभाव त्यांच्यावर झाला असे म्हटले ते अतिशयोक्ती होणार नाही. या संदर्भात रा. ग. जाधव म्हणतात, "मराठीतील स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित-ग्रामीण लेखकांनी जी आत्मकथनं लिहिलीती गांधीजींच्या आत्मकथेचे परिशीलन करून लिहिली असती तर त्यांचे स्वरूप गुणवत्ता व ग्राहयता कितीतरी प्रमाणात वाढली असती असे मला वाटते, अर्थात अजूनही या कामी उशीर झाला आहे असे समजण्याचे कारण नाही. "(जाधव, २००१:१८१) याचा अर्थ असा की, दलित आत्मकथनाने आंबेडकर स्विकारला की गांधीवाद नाकारायचा हे सूत्रच ठरल्यामुळे आपोआपच या आत्मकथनातून आंबेडकरी वाद किंवा विचार पूज्य मानून लिखाण झालेले दिसते. महाराष्ट्रातील जनतेला शहराकडे जावे की नाही या व्दिधा मनस्थितीत राहिल्यामुळे त्यांची गांधीवादावरची पकड सैल झालेली दिसते. गांधी आणि आंबेडकर यांच्यात जे संप्रेषण व्हायला पाहिजे ते झाले नाही. काही विचारवंत त्या दृष्टीने आपला विचार मांडताना दिसतात. ही गोष्ट स्वागतार्हच म्हणावी लागेल- दलित साहित्याने जरी गांधी मनोमन नाकारला असला तरी ग्रामीण साहित्याच्या चळवळीने जोम पकडताना बदलत्या खेडयाचा वेध घेत असताना जीवनवादी परिवर्तनवादी भूमिका स्विकारलेली दिसते. आनंद यादवांच्या अनेक कादंबऱ्यातून गांधीवादाची प्रेरणा दिसून येते. शरद जोशींनी शेतकरी संघटना सुरू केली. ती ग्रामीण साहित्याची प्रेरणा वाटते. मात्र शरद जोशींनी मांडलेले शेतकऱ्यांच्या शोषणाचा सिद्धांतच मुळात गांधी आणि म. फुले यांच्या तत्वज्ञानावर आधारित असा आहे. त्यांची इंडिया आणि भारत या दोन संकल्पना गांधीच्या शहरी सभ्यता आणि ग्राम्य संस्कृती यातून आलेल्या आहेत. शरद जोशींनी गांधीच्या 'श्रमाला प्रतिष्ठा या तत्वाची मांडणी 'घामाला दाम' या तत्त्वात मांडली आहे. देशीवादी नेमाडे तर गांधीवादाला आजच्या संदर्भात आधिक जवळ करताना दिसतात. यासंदर्भात डॉ. वासुदेव सावंत म्हणतात. "आज स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्ष झाल्यानंतरही पाश्चात्य संस्कृती आणि जीवनविषयक दृष्टिकोन याचा प्रभाव ज्या झपाटयाने वाढत चाललेला आहे आणि कोण्याही पर्यायी व्यवस्थेला स्थान न राहता पाश्चात्यांच्या आर्थिक वसाहतवादापुढे आपण जी शरणागती पत्करलेली आहे. ती पाहता गांधीची भूमिका आजच्या काळात अधिक अन्वर्थक ठरणारी आहे." (सावंत, २००१:४४) थोडक्यात काय तर गांधीवाद जरी पटत नसला तरी तो गांधील माशीसारखा आपल्या अंतरंगात चिकटून राहिलेला आहे. सर्व वाद जरी संपले तरी नाईलाजास्तव का होईना आपल्याला गांधीवादाकडे वळावे लागते याचे कारण गांधीवाद ही एक समाजमान्य रूह जीवन जगण्याची पध्दत झाली आहे. गांधी एक मूल्य आहे असे म्हटल्यास ते टोकाचे ठरणार नाही.

त्या त्या प्रदेशातील नेतृत्वाचा, विचाराचा प्रभाव त्या साहित्यावर होताना दिसतो. भारतीय समाजमनावर म. गांधीच्या विचारांचा परिणाम झालेला आहे. भारतीय स्वातंत्र्याला नवचैतन्य देण्याचे श्रेय म. गांधीजींनीचा द्यावे लागेल. म. गांधींनी आपली नीतिमुल्य निश्चित केली होती. त्यांचे तत्वज्ञान सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ब्रम्हाचर्य, शरीरश्रम, स्वदेशी, जीभेवरील नियंत्रण, सर्वधर्म समभाव, अस्पुश्यता न मानने ही नितीमुल्ये म्हणजेच गांधीवाद होय. गांधीविचारांचा प्रभाव येथील समाजमनावर होता. त्यामुळे या सर्व परिस्थितीचे चित्रण मराठी साहित्याने टीपले आहे. गांधीवाद आणि मराठी साहित्याचा धांडोळा घेताना गांधीवाद हा आजच्या जागतिकीकरणाच्या धकाधकीत कधीही न संपणारा झरा आहे. शहरे जरी कारखान्यानी गच्च भरली असलीतरी गांधी म्हणतात की, खेडयाकडे जावून तेथे कारखानदारी सुरू करा. खेडयातील बेकारांच्या हातांना काम दया.

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जग हे एक खंडे बनले आहे. या अशा बिकट परिस्थितीत लेखकाचे काय काम आहे यासंदर्भात महाश्वेतादेवी म्हणतात, "झाडाची मूळे जशी जमिनीत खोलवर गेलेली असतात तशीच साहित्याची मुळेदेखील जीवनात रुजलेल असली पाहिजेत. शेतकरी, मजूर भूमिहीन मजुर साहित्याचा भाग विषय असण्याची गरज आज निर्माण झाली पाहिजे" (वाड्मय कोष, खंड ३:१४६) वर्तमान परिस्थितीत गांधीवादाला दुसरा कोणताच पर्याय उरला नाही. रशिया मध्ये महापुरूषांच्या विचाराला बंदी असण्याचे कारण या विचारातच आहे.

आपण मात्र दोन्ही विचाराच्या बांधावर वाट पाहत आहोत क्रांती आपोआप होण्याची 'कलेने महापुरुषांच्या पाठीमागे जावे' अशी म्हण जरी असलीतरी आज महात्मा गांधीच्या विचारांची अहिंसेची, ग्रामस्वराजाची, सर्वधर्म सहिष्णूतेची आज देशाला गरज आहे. वैचारिक दृष्टया गांधीवादाला विरोध असला तरी त्याचा परिणाम मराठी साहित्यावर होताना दिसतो आहे. या गांधीवादाची गरज साहित्यिक नक्कीच आपल्या साहित्यातून पुर्ण करतील अशी आशा वाटते. गांधीवादाचा प्रभाव एक वरेकर सोडला तर मराठी नाटकावर झाला नाही. गांधी आणि गांधीवादाचा परिणाम महाराष्ट्रावर थोड्या प्रमाणात झाला आहे हे खरे आहे. परंतु महाराष्ट्राची भूमी गांधीवादाला फारशी अनुकूल नाही. गांधीवाद हा या काळातील ललित साहित्य निर्मितीचा किंवा साहित्याचा केंद्रवर्ती भाग बनू शकला नाही. त्यामुळे आचार्य जावडेकर, शंकरदेव, विनोबा भावे, साने गुरुजी, धर्माधिकारी इ. गांधीवादी मंडळी सोडून दिल्यास गांधीवाद हा पाहिजे तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्रात रुजू शकला नाही असे आपणास खेदाने म्हणावे लागेल.

संदर्भ :-

१. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या आनंद यादव
२. गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य संपा. द. दि. पुंड, प्रतिमा प्रकाशन १९९५
३. ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा डॉ. वासुदेव मुलाटे
४. आधुनिक भारत प्रा. एस. एस. भांडवलकर
५. समोक्षेतील नव्या संकल्पना संपा. डॉ. मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१
६. भारतीय संस्कृति सानेगुरूजी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे. एकविसावे पुनर्मुद्रण २००८
७.म.गांधीदर्शन सानेगुरुजी, हनुमान प्रकाशन, पुणे. १९९९
८. ग्रामीण साहित्य चळवळ प्रेरणा व स्वरूप डॉ. राजीव यशवंते